(१९९)


Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education
S.R.No.832-A, Final Plot No. 178,179,
Near Balchitrawani, Behind Agharkar
Research Institute, Bhamburda,
Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
स.नं.८३२–ए, फा.प्लॉ.नं. १७८, १७९,
बालचित्रवाणी शेजारी, आघारकर रिसर्च
इन्स्टिटयूटच्या मागे, भांबुर्डा,
शिवाजीनगर, पुणे ४११ ००४.

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 & EPABX -25705000 &
Email : secretary.stateboard@gmail.com


**महत्वाचे / तातडीचे**

क्रमांक–रा.मं./परीक्षा–६/२९२८
पुणे ४११ ००४.
दिनांक– ०३.०६.२०२४

प्रति,

विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे.

विषय - माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) पुरवणी परीक्षा जुलै–ऑगस्ट २०२४ च्या वेळापत्रकाबाबत

उपरोक्त विषयास अनुसरून कळविण्यात येते की, मंडळामार्फत जुलै–ऑगस्ट २०२४ मध्ये घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) पुरवणी परीक्षेची वेळापत्रके अंतिम करण्यात आलेली असून, दिनांकनिहाय सविस्तर वेळापत्रके या पत्रासोबत जोडण्यात आलेली आहेत. त्यानुसार लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा खालील कालावधीत आयोजित करण्यात येणार आहे.

| अ.क्र. | तपशील | लेखी परीक्षा कालावधी |
|---|---|---|
| १. | उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.१२वी) – सर्वसाधारण व द्विलक्षी विषय व ऑनलाईन परीक्षा | मंगळवार, दि. १६ जुलै, २०२४ ते गुरूवार, दि. ०८ ऑगस्ट, २०२४ |
| २. | उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.१२वी) – व्यावसायिक विषय | मंगळवार, दि. १६ जुलै, २०२४ ते शनिवार, दि. ०३ ऑगस्ट, २०२४ |
| ३. | माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (इ.१०वी) | मंगळवार, दि. १६ जुलै, २०२४ ते मंगळवार, दि. ३० जुलै, २०२४ |

प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी व अंतर्गत मूल्यमापन परीक्षा खालील कालावधीत आयोजित कराव्यात.

| अ.क्र. | **उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी)** | परीक्षा कालावधी |
|---|---|---|
| १. | प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी व अंतर्गत मूल्यमापन परीक्षा | मंगळवार, दि. १६ जुलै, २०२४ ते शनिवार, दि. ०३ ऑगस्ट, २०२४ |
| २. | NSQF अंतर्गत व्यावसायिक अभ्यासक्रम विषयांची प्रात्यक्षिक परीक्षा | |

| अ.क्र. | **माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी)** | परीक्षा कालावधी |
|---|---|---|
| १. | प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी व अंतर्गत मूल्यमापन परीक्षा | मंगळवार, दि. १६ जुलै, २०२४ ते मंगळवार, दि. ३० जुलै, २०२४ |
| २. | NSQF अंतर्गत व्यावसायिक अभ्यासक्रम विषयांची प्रात्यक्षिक परीक्षा | |
| ३. | शरीरशास्त्र, आरोग्यशास्त्र व गृहशास्त्र विषयांची प्रात्यक्षिक परीक्षा | मंगळवार, दि. १६ जुलै, २०२४ ते शुक्रवार, दि. २६ जुलै, २०२४ |
| ४. | दिव्यांग विद्यार्थ्यांची कार्यशिक्षण विषयांची लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा | |

Scanned with AltaScanner

१) जुलै–ऑगस्ट पुरवणी परीक्षेसाठी इ.१०वी व इ.१२वी च्या प्रात्यक्षिक परीक्षा प्रचलित पध्दतीनुसार केंद्रावर घेतली जात होती. तथापि त्यामध्ये बदल करण्यात येवून इ.१०वी व इ.१२वीची प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी व अंतर्गत मुल्यमापनाची परीक्षा देखील संबंधित शाळा/कनिष्ठ महाविद्यालयामध्ये घेण्यात यावी याबाबत संदर्भ–पत्र क्र.रा.मं./परीक्षा–२/५५०८, दि.२६/१२/२०२३ नुसार सर्व विभागीय मंडळांना कळविण्यात आलेले आहे.

२) प्रात्यक्षिक, तोंडी व अंतर्गत मुल्यमापनाचे गुण फेब्रुवारी–मार्च २०२४ परीक्षेप्रमाणेच OMR Sheet ऐवजी Portal वर ऑनलाईन पध्दतीने पाठवावयाचे आहेत. याबाबतची Link आपणांस यथावकाश कळविण्यात येईल.

३) परीक्षेचा कालावधी मर्यादित असल्याने या परीक्षेसाठी प्रात्यक्षिक, तोंडी व श्रेणी परीक्षा, आणि अंतर्गत मूल्यमापन परीक्षा 'Out of Turn' ने आयोजित करण्यात येणार नाही. तरी विद्यार्थी संख्येनुसार शाळा / कनिष्ठ महाविद्यालयामध्ये निर्धारित कालावधीत प्रात्यक्षिक /तोंडी परीक्षा / श्रेणी परीक्षा घेण्याबाबत तसेच संबंधीत विद्यार्थ्यांना त्यांचा परीक्षेचा दिनांक व वेळ याबाबतची संपूर्ण माहिती प्रत्यक्ष परीक्षेपूर्वी मिळेल याची दक्षता घेण्याबाबत शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांना सूचित करावे.

४) इ.१०वी च्या दिव्यांग विद्यार्थ्यांची कार्यशिक्षण विषयांची लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा सोबतचे परिशिष्टानुसार शालेय स्तरावर आयोजित करण्याबाबत संबंधीतांना कळविण्यात यावे. त्यानुसार पूर्वसूचना देवून संबंधीत विषयांचा प्रश्नपत्रिकेचा संच मिळण्याकरीता पुणे विभागीय मंडळाशी तातडीने संपर्क साधावा.

५) इ.१०वी व इ.१२वी प्रात्यक्षिक परीक्षेसाठी अंतर्गत व बहिस्थ परीक्षक म्हणून ज्या त्या शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांची नियुक्ती करण्यात यावी.

६) इ.१२वी माहिती तंत्रज्ञान (I.T.), व सामान्यज्ञान (G.K.) या विषयांची परीक्षा ऑनलाईन पध्दतीने दि.०७.०८.२०२४ व दि.०८.०८.२०२४ रोजी घेण्यात येणार आहे. सर्व विद्यार्थ्यांची ऑनलाईन परीक्षा कनिष्ठ महाविद्यालयातील संगणकाची मर्यादित संख्या लक्षात घेता एकाच वेळी घेणे शक्य नसल्याने ती गटागटामध्ये घेण्यात येईल. कनिष्ठ महाविद्यालयांना संगणक प्रयोगशाळेच्या क्षमतेप्रमाणे विद्यार्थ्यांचे गट करून, त्याप्रमाणे कनिष्ठ महाविद्यालयांनी परीक्षेचा दिनांक व वेळ संबंधित विद्यार्थ्यांना पुरेसा कालावधी याची माहिती परीक्षेपूर्वी करून देणे आवश्यक आहे.

जुलै–ऑगस्ट २०२४ पुरवणी परीक्षांच्या वेळापत्रकांची छपाई राज्य मंडळामार्फतच करण्यात येणार असल्याने शाखा भांडार, राज्य मंडळ, पुणे मार्फत सदर वेळापत्रकांच्या प्रती आपल्या मागणीप्रमाणे विभागीय मंडळांना पुरविणेबाबत पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे तरी जुलै–ऑगस्ट २०२४ मध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) सर्वसाधारण व व्दिलक्षी व व्यवसाय अभ्यासक्रम व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) पुरवणी परीक्षेच्या अंतिम वेळापत्रकांच्या प्रतीबाबत शाखा भांडार, राज्य मंडळ, पुणे यांच्याशी संपर्क साधावा.

(अनुराधा ओक)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे ४.

उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) (सर्वसाधारण व व्दिलक्षी) परीक्षेचे वेळापत्रक
उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) (व्यवसाय अभ्यासक्रम) परीक्षेचे वेळापत्रक
माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेचे वेळापत्रक

**ीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी–**

व्यवस्थापक, गणकयंत्र विभाग, राज्य मंडळ, पुणे.
अस्वीस, राज्य मंडळ, पुणे.
ऑनलाईन शाखा, राज्य मंडळ, पुणे.
भांडार–१, शाखा, राज्य मंडळ, पुणे.

Scanned with AltaScanner